Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)with CGPA3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

### विषय : गोपनीय अहवाल सन २०२५-२०२६

विद्यापीठातील शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांच्या सन २०२५-२०२६ मधील गोपनीय अहवालांच्या छायांकित प्रती देणेबाबत व अभिवेदन सादर करणेबाबत खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१. दि. ३० जून पर्यंत, वर्ग १ ते ३ मधील सर्व अधिकारी व सेवकांनी त्यांच्या गोपनीय अहवालांची छायांकीत प्रत खाली दिलेल्या वेळापत्रकानुसार आस्थापना विभाग-२ (खोली क्र. २२७) मधून प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत.

२. संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांना त्यांच्या गोपनीय अहवालांची छायांकीत प्रत मिळाल्यानंतर त्या संदर्भात **अभिवेदन द्यावयाचे असल्यास ते दि. ३०/०७/२०२६ पर्यंत** संबंधीत अधिविभाग/विभाग प्रमुखांमार्फत आवक विभाग येथे सादर करावेत, दि. ३०/०७/२०२६ नंतर प्राप्त होणारे अभिवेदन विचारात घेतले जाणार नाहीत.

३. दि.०१/११/२०११ च्या शासन आदेशानुसार इतर अनुषंगीक लाभांच्या किंवा पदोन्नतीच्या आड येणाऱ्या शेऱ्यांविषयीचे अभिवेदन सादर करावे.

**४. वार्षिक गोपनीय अहवालांची छायांकीत प्रत पुढील वेळापत्रकानुसार समक्ष मुख्य इमारत, आस्थापना - २ विभाग, खोली क्र. २२७ मधून प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत.**

| अ. क्र. | अधिकारी/कर्मचाऱ्यांचे पदनाम | गोपनीय अहवालाची छायांकीत प्रत स्वीकारण्याचा दिनांक |
|---|---|---|
| १ | अधीक्षक / सहा.अधीक्षक / वरीष्ठ सहाय्यक | दि. २९/०६/२०२६ |
| २ | कनिष्ठ सहाय्यक / वर्ग २ व ३ मधील उपरोक्त पदे वगळून इतर तांत्रिक व अतांत्रिक सर्व पदे. | दि. ३०/०६/२०२६ |

**टिप:- वर्ग १ मधील अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवालाच्या छायांकित प्रती समक्ष संबंधीत अधिकारी यांना शिपायामार्फत पाठविण्यात येतील.**

कुलसचिव

**जा.क्र. आस्थापना-२/502**
**दिनांक:** 22 JUN 2026

**प्रति,**

१) मा. कुलगुरु, प्र. कुलगुरु, कुलसचिव, संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी यांना माहितीसाठी.
२) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक.
३) सर्व उपकुलसचिव, सहाय्यक कुलसचिव.
४) सर्व प्रशासकीय विभागप्रमुख, जनसंपर्क अधिकारी.
५) सर्व प्रशासकीय सेवक.

**सदरचे परिपत्रक आपल्या अधिविभागातील/विभागातील सर्व प्रशासकीय सेवकांच्या निदर्शनास आणावे.**